

ठाणे रेल्वे स्थानक

# सखल भाग जलमय, आजही मुसळधारांचा इशारा

## रेल्वे, रस्ते वाहतूक विस्कळीत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** गेले तीन - चार दिवस मुंबई शहर, उपनगरांत मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यातच हवामान खात्याने शुक्रवारी मुंबईला अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला होता. त्यानुसार मुंबई शहर, तसेच उपनगरांत शुक्रवारी दुपारी १२ नंतर पावसाचा जोर वाढला. मुंबईतील कुर्ला, चेंबूर, विक्रोळी, अंधेरी परिसरात मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे सखलभाग जलमय झाले आणि रस्ते वाहतूक विस्कळीत झाली. त्याचबरोबर हार्बर मार्गावरही पाणी साचल्याने काही काळ लोकलचा खोळंबा झाला.

राज्यातील अनेक भागांत गेल्या तीन - चार दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. मुंबईत शुक्रवारी कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे रस्ते, तसेच रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला. शुक्रवारी दुपारी १ ते २ च्या दरम्यान कुर्ला येथे पाऊस पडला. या एका तासात कुर्ला येथे ३६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. यामुळे कुर्ला येथे हार्बर मार्गावर पाणी साचले.

पश्चिम द्रुतगती मार्गावर वांद्रे येथे पाणी साचले. त्यामुळे काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. दादर पूर्व भागातही पाणी साचले. 'अंधेरी सब वे'ही जलमय झाला होता. मुसळधार पावसामुळे मुंबईतील शीव, चेंबूर, हिंदमाता आदी परिसर जलमय झाले आणि या भागातून जाणाऱ्या बेस्टच्या गाड्या अन्य मार्गाने वळवाव्या लागल्या. तसेच शीव येथील सखलभागात पाणी साचल्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली. दरम्यान, हिंदमाता, अंधेरी सब वे, डॉकयार्ड जंक्शन, दादर टी.टी, माटुंगा आणि महालक्ष्मी या भागात अर्धा ते एक फूट पाणी साचल्याने तेथील वाहतूक विस्कळीत झाली.

हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात सकाळी ८ ते सायंकाळी ५.३० या कालावधीत ९२.२ मिलिमीटर, तर, सांताक्रूझ केंद्रात ११५.२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

**रत्नागिरी व रायगडमध्ये अतिमुसळधार ...**

कोकणातही सर्वत्र मुसळधार पाऊस कोसळत आहे. दरम्यान, हवामान विभागाने रत्नागिरी व रायगड जिल्ह्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तर, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदिया या चार जिल्ह्यांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



### पुढील आठवडाभर पावसाला पोषक स्थिती...

उपसागरात निर्माण झालेली चक्रिय स्थिती, तसेच मध्यपूर्व बंगालच्या उपसागरात तयार होणारा कमी दाबाचा पट्टा यामुळे पुढील आठवडाभर राज्यात पावसाला पोषक स्थिती असून अनेक भागांत मुसळधार ते अतिवृष्टी होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. यामुळे मुंबईसह ठाणे शहरात शनिवारी अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तर, पालघर जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.



### मुंबईत शुक्रवारी दुपारी १ ते २ दरम्यानचा पाऊस

(मिलिमीटरमध्ये)

- एफ उत्तर विभाग कार्यालय : ३४
- वडाळा अग्निशमन केंद्र : ३०
- कुलाबा : २९
- वरळी अग्निशमन केंद्र : २७
- विक्रोळी : ५०
- चेंबूर : ४२
- कुर्ला : ३६
- मरोळ : ६१
- विलेपार्ले, सांताक्रुझ : ४५
- अंधेरी : ४२

# अर्धांगवायूमुळे आरोपीची जन्मठेप स्थगित

## मानवतेच्या दृष्टिकोनातून उच्च न्यायालयाचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** खून प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आरोपीला गेल्या महिन्यामध्ये अर्धांगवायूचा झटका आला. त्यामुळे मानवतेच्या दृष्टिकोनातून उच्च न्यायालयाने त्याची शिक्षा स्थगित करत त्याला जामीन मंजूर केला. मात्र, आरोपीच्या कुटुंबीयांनी त्याची जबाबदारी घेण्यास नकार दिला. याची दखल घेत न्यायालयाने त्याला ससून रुग्णालयातून जनसेवा फाउंडेशनच्या वृद्धाश्रमात हलविण्याचे आदेश येरवडा कारागृह प्रशासनाला दिले.

जनसेवा फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या आंबीफाटा पानशेत येथील वृद्धाश्रमात याचिकाकर्त्याला ठेवण्यात येणार आहे. तसेच त्याची आयुष्यभर काळजी घेण्याचे आणि त्याच्या वैद्यकीय स्थितीची माहिती नियमितपणे कारागृह प्रशासनाला देण्याचे मान्य केले आहे. या सगळ्या बाबींचा विचार करता याचिकाकर्त्याची जन्मठेपेची शिक्षा स्थगित करून त्याला जामीन मंजूर केला गेला आहे. याचिकाकर्त्याची वैद्यकीय स्थिती लक्षात घेऊन जामीन मंजूर करताना घालण्यात येणाऱ्या अटीही माफ केल्या आहेत. मात्र, या प्रकरणातील स्थिती विचारात घेऊनच असा आदेश दिल्याचे न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

# माहिती-तंत्रज्ञान कायद्यातील दुरुस्तीची ४ सप्टेंबरपर्यंत अंमलबजावणी नाही

## केंद्र सरकारची उच्च न्यायालयात हमी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** सरकारविरोधात समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या खऱ्या - खोट्या ठरवण्याचा अधिकार केंद्र सरकारला देणाऱ्या माहिती - तंत्रज्ञान नियमांतील दुरुस्तीची ४ सप्टेंबरपर्यंत अंमलबजावणी केली जाणार नाही, अशी हमी केंद्र सरकारच्या वतीने महान्यायवादी तुषार मेहता यांनी शुक्रवारी उच्च न्यायालयात दिली.

सरकारने माहिती-तंत्रज्ञान कायद्यात केलेल्या दुरूस्तीला हास्यकलाकार कुणाल कामरा याच्यासह विविध संघटनांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. तसेच, सुधारित नियम घटनाबाह्य घोषित करावेत आणि या सुधारित नियमांनुसार कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्यापासून सरकारला मज्जाव करण्याचे आदेश देण्याची मागणी याचिकांद्वारे करण्यात आली आहे. या याचिकांवर न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू असून याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद पूर्ण झाला आहे. २७ आणि २८ जुलै रोजी केंद्र सरकारच्या वतीने महान्यायवादी मेहता हे सुधारित नियमांच्या समर्थनार्थ युक्तिवाद करणार होते. मेहता यांनी शुक्रवारी हे प्रकरण खंडपीठाकडे नमूद केले. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठासमोरील प्रकरणामुळे या तारखांना आपल्याला युक्तिवाद करणे शक्य होणार नाही, असे सांगून मेहता यांनी ऑगस्ट अखेरीस प्रकरणाची सुनावणी ठेवण्याची विनंती केली.

### केंद्र सरकारच्या मौनावर न्यायालयाने बोट

याचिकाकर्त्यांच्या युक्तिवादाच्या वेळी न्यायालयाने सुधारित माहिती - तंत्रज्ञान कायद्याबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले. 'प्रेस इन्फोर्मेशन'सारखी यंत्रणा कार्यरत असताना सत्यशोधन समितीची आवश्यकता काय, कायद्यातील दुरूस्तीमागील नेमका हेतू काय, ती का करण्यात आली याबाबत केंद्र सरकारच्या प्रतिज्ञापत्रातील मौनावरही न्यायालयाने बोट ठेवले होते. नवीन नियम सरकार आणि सरकारच्या कामांबाबतच मर्यदित का, समाजमाध्यमांवरून प्रसिद्ध होणाऱ्या अन्य मजकुराला तो लागू का नाही, असा प्रश्नही न्यायालयाने केंद्र सरकारला केला होता.

# पुनर्विकासातील रहिवाशांसाठी १०० रुपये मुद्रांक शुल्कच लागू?

## नव्या निर्णयामुळे संभ्रम

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** स्वयंपुनर्विकासात रहिवाशासोबत होणाऱ्या वैयक्तिक करारनाम्यावर हजार रुपये मुंद्रांक शुल्क लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने गेल्या आठवड्यात जारी केला. मात्र, स्वयंपुनर्विकासच नव्हे तर सर्वच पुनर्विकासात रहिवाशी व विकासक यांच्यामध्ये होणाऱ्या करारनाम्यावर शंभर रुपये मुद्रांक शुल्क आकारण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला असून याबाबतची शासनाची सर्व परिपत्रकेही रद्द केली आहेत. असे असतानाही महसूल विभागाने हजार रुपये मुद्रांक शुल्क लागू करण्याचा शासन निर्णय जारी करून आपले अज्ञान जाहीर केले आहे, असा आरोप मुंबई ग्राहक पंचायतीने केला आहे.

उच्च न्यायालयाचे न्या. गौतम पटेल आणि न्या. नीला गोखले यांच्या खंडपीठाने १७ फेब्रुवारी २०२३ रोजी या संदर्भात दिलेल्या निर्णयानुसार विकासक आणि पुनर्विकासातील रहिवाशांमध्ये होणाऱ्या करारावर बांधकाम मूल्यावर आधारीत नव्हे तर फक्त शंभर रुपये मुद्रांक शुल्क आकारावे, असे स्पष्ट आदेश दिले आहेत. या निर्णयात स्वयंपुनर्विकासाचाही उल्लेख आहे. स्वयंपुनर्विकासात विकासक नसतो. सर्व व्यवहार गृहनिर्माण संस्था व सदस्य यांच्यात होतो. त्यासाठी संस्थेने सदस्यांबरोबर वैयक्तिक करार केला किंवा वितरण पत्र दिले तर त्यावरही फक्त शंभर रुपये इतकेच मुद्रांक शुल्क भरावे लागेल, असेही या आदेशात म्हटले आहे.

या निर्णयानुसार पुनर्विकासात जुन्या सदनिकेच्या बदल्यात त्याच क्षेत्रफळाची अथवा प्रचलित कायद्यानुसार वा करारानुसार, जास्त क्षेत्रफळाची जागा रहिवाशांना मोफत मिळत असेल तर त्याबाबत होणारा करार किंवा कागदपत्र यावर फक्त शंभर रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागणार आहे.

याबाबत महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांच्याशी संपर्क साधला. परंतु त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

MCT
MANJARA CHARITABLE TRUST
RAJIV GANDHI INSTITUTE OF TECHNOLOGY, MUMBAI
(Approved by AICTE, permanently affiliated to University of Mumbai and recognized to DTE)
NAAC Accredited NBA Accredited (UG program)
Juhu-Versova Link Road, Behind HDFC Bank, Versova, Andheri (W), Mumbai-400053
Tel: (022)26707025 / 26 / 27, Fax: (022)26707026, Email: principal.rgit@mctrgit.ac.in
website http://www.mctrgit.ac.in
DTE Code:3135

ADMISSION NOTIFICATION (ACADEMIC YEAR 2023-2024)

Applications are invited from eligible candidates for admission to **First Year Engineering against 20% Institute Level Seats, Vacant Seats, if any after Government CAP rounds and Direct Second Year Engineering Vacant Seats, if any after Government CAP rounds** of four years' engineering degree courses in the following branches.

| Courses | Total Seats | Institute level |
|---|---|---|
| Artificial Intelligence and Data Science | 60 | 12 |
| Computer Engineering | 120 | 24 |
| Electronics and Telecommunication Engineering | 120 | 24 |
| Information Technology | 60 | 12 |
| Mechanical Engineering | 120 | 24 |

- **Eligibility:** As prescribed by Govt. of Maharashtra, State Common Entrance Cell. As per the notified rules, candidates aspiring for admission for Institute level quota, vacant seats if any after CAP rounds. It is a prerequisite and mandatory to get online registration completed and get documents verified and confirmed at the Scrutiny Centre.
- A candidate can get application form and prospectus from the college office between **8.30 a.m. and 4.00 p.m.** on all working days, for 10 days from the date of publication of this advertisement on payment of non-refundable processing fees of Rs. 1000/-. Admissions for these seats shall commence after the CAP round III.
- Completed application forms should be submitted at the college office only. Incomplete applications or applications received after due date will be rejected without assigning any reason.

**Ragging is totally banned and anyone found guilty of ragging and/or abetting ragging is liable to be punished.**

Principal

राजश्री 50
Government Lottery
Govt of Goa
तुम्हाला व्हायला आवडेल का...
आमचा पुढचा विजेता?
तिकिट ₹50



पहिले बक्षीस
₹ 20 लाख
ड्रॉ दिनांक : 27.07.2023
ड्रॉ दर चौथा गुरुवार सायं 6.30 वाजता
तिकिट सर्व जवळच्या लॉटरी आउटलेट वर उपलब्ध
Book Now At: bookmyrajshree.com
Call Now : 022 6835 1535
LIVE STREAMING
youtube.com/RajshreeLottery

Hindustan Unilever Limited

नोंदणीकृत कार्यालय: युनिलीवर हाउस, बी.डी. सावंत मार्ग, चकाला, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०९९
CIN: L15140MH1933PLC002030; फोन: +९१ (२२) ५०४३ ३०००. Email: levercare.shareholder@unilever.com

उलाढालीतील ग्रोथ +७%
अंडरलाईंग व्हॉल्यूम ग्रोथ +३%
पीएटी ग्रोथ +८%

वर नमूद केलेली आकडेवारी वर्षामागून वर्षाची तुलना दर्शविते.

हिंदुस्तान युनिलीवर लिमिटेडच्या दि. ३० जून, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचा गोषवारा (स्वतंत्र)

(₹ कोटींमध्ये)

| तपशील | स्वतंत्र: ३० जून रोजी संपलेल्या तिमाहीचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष | | ३१ मार्च रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष |
|---|---|---|---|
| | २०२३ | २०२२ | २०२३ |
| परिचालनाद्वारे झालेले महसूल | १५,१४८ | १४,२७२ | ५९,१४४ |
| सामान्य व्यवहारांद्वारे झालेला वित्तीय खर्चानंतरचा परंतु अपवादात्मक बाबींपूर्वीचा नफा | ३,४०२ | ३,०९८ | १३,९४१ |
| करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक बाबींनंतरचा) | ३,३६५ | ३,०८६ | १३,०७९ |
| करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक बाबींनंतरचा) | २,४७२ | २,२८९ | ९,९६२ |
| इतर व्यापक मिळकत (करानंतर) | १२ | ३५ | (२६) |
| एकूण व्यापक उत्पन्न (करानंतर) | २,४८४ | २,३२४ | ९,९३६ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (प्रत्येकी रू.१/-या मूल्याचे, पूर्णत: भरणा झालेले) | २३५ | २३५ | २३५ |
| राखीव निधी | | | ४९,९८६ |
| प्रत्येक शेअरवरील मिळकत (प्रत्येकी रू.१/-या मूल्याच्या) | | | |
| बेसिक | ₹१०.५२ | ₹९.७४ | ₹४२.४० |
| डायल्युटेड | ₹१०.५२ | ₹९.७४ | ₹४२.४० |

हिंदुस्तान युनिलीवर लिमिटेडच्या दि. ३० जून, २०२३रोजी संपलेल्या तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचा गोषवारा (एकत्रित)

(₹ कोटींमध्ये)

| तपशील | एकत्रित: ३० जून रोजी संपलेल्या तिमाहीचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष | | ३१ मार्च रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष |
|---|---|---|---|
| | २०२३ | २०२२ | २०२३ |
| परिचालनाद्वारे झालेले महसूल | १५,४९६ | १४,६२४ | ६०,५८० |
| सर्वसाधारण कामकाजाद्वारे झालेला नफा, वित्तीय खर्चानंतरचा पण सततच्या परिचालनातील अपवादात्मक बाबींपूर्वीचा | ३,५११ | ३,२२६ | १३,४०९ |
| सततच्या परिचालनाद्वारे झालेला करपूर्व नफा (अपवादात्मक बाबींनंतरचा) | ३,४७४ | ३,२१४ | १३,३४५ |
| सततच्या परिचालनाद्वारे झालेला निव्वळ करानंतरचा नफा (अपवादात्मक बाबींनंतरचा) | २,५५६ | २,३९१ | १०,१४४ |
| खंडित झालेल्या परिचालनाद्वारे झालेला निव्वळ करानंतरचा नफा (अपवादात्मक बाबींनंतरचा) | (०) | (०) | (१) |
| इतर व्यापक मिळकत (करानंतर) | १२ | ३५ | (२६) |
| एकूण व्यापक उत्पन्न (करानंतर) | २,५६८ | २,४२६ | १०,११७ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (प्रत्येकी रू.१/-या मूल्याचे, पूर्णत: भरणा झालेले) | २३५ | २३५ | २३५ |
| राखीव निधी | | | ५०,०६९ |
| सततच्या परिचालनाद्वारे झालेली प्रत्येक शेअरमागील मिळकत (प्रत्येकी रू.१/-चा) | | | |
| बेसिक | ₹१०.८७ | ₹१०.१३ | ₹४३.०७ |
| डायल्युटेड | ₹१०.८७ | ₹१०.१३ | ₹४३.०७ |
| खंडित झालेल्या परिचालनाद्वारे झालेली प्रत्येक शेअरमागील मिळकत (प्रत्येकी रू.१/-चा) | | | |
| बेसिक | ₹(०.००) | ₹(०.००) | ₹(०.००) |
| डायल्युटेड | ₹(०.००) | ₹(०.००) | ₹(०.००) |

वर नमूद केलेला मजकूर हा, सेबीच्या (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम, २०१५ च्या नियम ३३ च्या अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजकडे फाइल केलेल्या दि. ३० जून, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीच्या तपशीलवार वित्तीय निष्कर्षांचा गोषवारा आहे. दि. ३० जून, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचा स्वतंत्र आणि एकत्रित फॉर्मेट स्टॉक एक्स्चेंजच्या www.nseindia.com या आणि www.bseindia.com या वेबसाइट्सवर आणि आमच्या http://www.hul.co.in या वेबसाइटवरील इन्व्हेस्टर रिलेशन्स (गुंतवणूकदार नातेसंबंध) विभागात उपलब्ध आहेत.

**तळटीप:**

दि. ३० जून, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीची मर्यादित पुर्नआढावा घेतलेली वित्तीय निवेदने, संचालक मंडळाने दि. २० जुलै, २०२३ रोजी झालेल्या आपल्या बैठकीत नोंदवून घेतली आहेत. वैधानिक लेखापरीक्षकांनी वर नमूद केलेल्या निष्कर्षांच्या बाबतीत फेरफार न केलेला रिपोर्ट व्यक्त केला आहे.

संचालक मंडळाच्या आदेशावरून
सही/-
**रोहित जावा**
व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी
[DIN: 10063590]

**स्थळ :** मुंबई
**दिनांक :** २० जुलै, २०२३

मूळ इंग्रजी मसुद्याचे हे भाषांतर असून सर्व विवादांमध्ये मूळ इंग्रजी मसुदा प्रमाण मानण्यात येईल.

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५००० • फॅक्स: ०२२-२२०४ २२६८
ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

**३० जून, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीचा अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय परिणामांचा संक्षिप्त गोषवारा**

(₹ कोटीत, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

| तपशील | संपलेले तिमाही ३० जून, २०२३ | संपलेले तिमाही ३० जून, २०२२ |
|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | २३१,१३२ | २४२,५२९ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | २०,३०१ | १९,८६५ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **२१०,८३१** | **२२२,६६४** |
| निरंतर सुरू असलेल्या कामकाजसाठी करपूर्व नफा | २४,३७० | २६,९९६ |
| **निरंतर सुरू असलेल्या कामकाजसाठी करपश्चात नफा** | **१८,२५८** | **१९,४०५** |
| बंद झालेल्या कामकाजातील नफा (कर वगळता) | - | ३८ |
| **कालावधीसाठी नफा** | **१८,२५८** | **१९,४४३** |
| बंद प्रचलनासह एकुण सर्वसमावेशक मिळकत (करपश्चात)* | १९,६०५ | १२,९२९ |
| भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल, इक्विटी समभाग प्रत्येकी दर्शनी मूल्य ₹१०/- मूल्याचा | ६,७६६ | ६,७६५ |
| पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी# | - | - |
| **प्रति इक्विटी समभाग मिळकत (₹ मध्ये) (प्रत्येकी दर्शनी मूल्य ₹१०/-)** | | |
| **सुरू असलेले कामकाज** | | |
| मूळ (₹ मध्ये) | २३.६६ | २६.४८ |
| सौम्य (₹ मध्ये) | २३.६६ | २६.४८ |
| **बंद केलेले कामकाज** | | |
| मूळ (₹ मध्ये) | - | ०.०६ |
| सौम्य (₹ मध्ये) | - | ०.०६ |
| **सुरू असलेले आणि बंद केलेले कामकाज** | | |
| मूळ (₹ मध्ये) | २३.६६ | २६.५४ |
| सौम्य (₹ मध्ये) | २३.६६ | २६.५४ |

*नियंत्रण विरहित स्वारस्य शेअर समाविष्ट
#३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या वर्षाचा पुर्नमूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी ₹७०९,१०६ कोटी.

**टिपा:**

१. २१ जुलै, २०२३ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रसारित करण्यास मंजुरी दिली आहे.

२. अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे:

(₹ कोटीत)

| तपशील | संपलेले तिमाही ३० जून, २०२३ | संपलेले तिमाही ३० जून, २०२२ |
|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | १२५,७१५ | १५६,६६० |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | ५,३०७ | ६,३७३ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **१२०,४०८** | **१५०,२८७** |
| निरंतर सुरू असलेल्या कामकाजसाठी करपूर्व नफा | १२,८४१ | १८,६२० |
| **निरंतर सुरू असलेल्या कामकाजसाठी करपश्चात नफा** | **९,७२६** | **१४,२२८** |
| बंद झालेल्या कामकाजातील नफा (कर वगळता) | - | ८६८ |
| **कालावधीसाठी नफा** | **९,७२६** | **१५,०९६** |
| बंद प्रचलनासह एकुण सर्वसमावेशक मिळकत (करपश्चात) | १०,५३६ | १०,४६६ |

३. ३० जून, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीचे तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स ॲन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस) रेग्युलेशन्स, २०१५ मधील रेग्युलेशन ३३ अनुशंगाने स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आले आहेत व वरील परिणाम त्यांचा संक्षिप्त गोषवारा आहेत.

३० जून, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीचे तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटवर **(www.bseindia.com / www.nseindia.com)** आणि कंपनीच्या वेबसाईटवर **(www.ril.com)** येथे उपलब्ध आहेत.

**रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** करिता
सही/-
मुकेश डी. अंबानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : २१ जुलै, २०२३

www.ril.com